# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/11/2022 (शुक्रवार) सकाळ

## घरफोडी

**१) पो.स्टे. बुट्टीबोरी** :— अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा लोकमत कॉलनी, बुट्टीबोरी येथे दिनांक १५/११/२०२२ ते दिनांक १६/११/२०२२ चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे— हेमंत सुरेश इंगळे, वय ३५ वर्ष, रा. प्लॉट नं. २०४, राय इंपेरीयल, शंकरपुर रोड हा नमुद घटना वेळी त्याच्या परीवारासह गावी मुक्कामी गेले असता दिनांक १७/११/२०२२ ला घरी परत आले असता त्यांच्या घराचे कुलुप तोडलेले दिसले व घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. आलमारी मधील लॉकर, दिवान व ड्रेसींग टेबल चेक केले असता तेथील १) नगदी अंदाजे १४००००/—रू २) सोन्याची ८.७ ग्रॅम ची अंगठी कीमती २००००/—रू. ३) १० ग्रॅम चा ०१ सोन्याचा सिक्का किमती २५०००/— रू ४) ०५ ग्रॅम सोन्याचे झुमके किमती ६,०००/—रू. ५) ०६ ग्रॅम सोन्याचे मुलीचे मणी, कानातील बारी किमती ७०००/—रू. ६) ३५० ग्रॅम चांदीचे पायपट्टी, मनगट, तोरडया किमती ४०००/— रू. जुने वापरते सोने व चांदीचे दागिणे व नगदी असा एकुण २,०२,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन बुट्टीबोरी करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०१ कि.मी. स्नेहनगर लेआउट मौदा येथे दिनांक १६/११/२०२२ चे २३.३० वा. ते दिनांक १७/११/२०२२ चे ०४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे—प्रशांत नानाजी वाकुलकर, वय ४२ वर्ष, रा. स्नेहनगर मौदा हे बाहेरगावी कार्यक्रमाला गेले असता फिर्यादीच्या घराचा लॉक तोडुन, आत प्रवेश करुन घरातील सामान अस्तव्यस्त दिसले. फिर्यादीच्या कपाटाचा लॉक तोडुन कपाटातील पिवळया रंगाच्या डब्यात ५०००/—रु. होते ते चोरुन नेले तसेच फिर्यादीच्या घराच्या बाजुला राहणारा नामे—तुषार बाबरे यांच्या कपाटातील ४०००/— रु. कोणीतरी अनोळखी ईसमाने चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन मौदा करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर